आपली सेवा आमचे कर्तव्य

**राज्य सेवा हक्क आयोग**
**राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त कार्यालय,**
**नविन प्रशासन भवन,७वा मजला,मंत्रालयासमोर —मुंबई -४०० ०३२**
**ई-मेल :-ccrts@maharashtra.gov.in** **दुरध्वनी :- ०२२-२२८३२३४६**

---

क्र. सेवानि-२०२३/प्र.क्र.४३ /मुसेहआ /कक्ष-१ दिनांक :- २२ सप्टेंबर, २०२३

प्रति,

संचालक,
माहिती तंत्रज्ञान विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

**विषय :-** शासनाच्या वेबसाईट / आंतरजाळ (इंट्रानेट) प्रणालीवर जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.

महोदय,

राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त यांच्या कार्यालयाकरीता गट अ (ग्रेड वेतन रु.७,६००/- पेक्षा कमी) या संवर्गातून सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा करारपध्दतीने विवक्षित कामासाठी आयोगावर नियुक्त करण्याबाबत अर्ज मागविण्याकरीता जाहिरातीचा मसुदा सोबत जोडला आहे. सदर जाहिरात शासनाच्या वेबसाईट / इंट्रानेट (आंतरजाळ) वर तातडीने प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

(वैशाली राज चव्हाण (निर्धार))
उप सचिव
राज्य मुख्य सेवा हक्क आयोग,मुंबई

**सोबत :-** सहपत्र

D:\गवस मॅडम\२०२३\२०२३ करार पद्धतीने नियुक्ती (Autosaved).docx

दिनांक:- २२.०९.२०२३

Application from retired Government Officers in cadre of Group A (Grade Pay less than Rs. 7600)

**राज्य सेवा हक्क आयोग**
**राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त यांचे कार्यालय**
**७ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई -४०० ०३२.**

शासकीय/ निमशासकीय सेवेतून गट अ (ग्रेड वेतन रु.७,६००/- पेक्षा कमी) संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/ कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने मानधन तत्वावर विवक्षित कामासाठी नामिकासूची करण्याकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | संवर्ग | विवक्षित कामाचे स्वरूप | वय अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|
| १ . | गट अ (ग्रेड वेतन रु.७,६००/- पेक्षा कमी) | "राज्य सेवा हक्क आयोगाचा वार्षिक अहवाल तयार करण्याकामी सांख्यिकी व इतर माहितीचे संकलन व विश्लेषण व त्याअनुषंगाने तांत्रिक बाबी" | गट -अ पदावरील कामकाजाचा किमान ३ . वर्षांचा अनुभव<br>अर्हता:- पदवीधर, संगणकाचे ज्ञान, सांख्यिकी विषयाचे ज्ञान असलेल्या उमेदवारांना प्राधान्य<br>वयोमर्यादा :- ५९ ते ६३ वर्ष |

**नियुक्तीच्या अटी व शर्ती :-**

१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. संकीर्ण -२७१५ / प्र.क्र.१००/१३ दिनांक १७.१२.२०१६ अन्वये नियुक्तीच्या अटी व शर्ती विनियमित करण्यात येतील.
२. करारपद्धतीने आयोगामध्ये नियुक्त केलेल्या व्यक्तींना कोणतेही पदनाम असणार नाही.
३. करार तत्वावरील नियुक्त व्यक्तीस अर्जित, नैमित्तीक व वैद्यकीय रजा अनुज्ञेय असणार नाहीत.
४. नियुक्तीच्या कालावधीत विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी करारपद्धतीने नियुक्ती देण्यात आलेल्या व्यक्तीची असेल.
५. करारपद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय/वित्तीय अधिकार नसतील. अशी व्यक्ती कोणत्याही शासकीय पत्र / आदेश यावर स्वाक्षरी करण्यास पात्र असणार नाही. इच्छूक सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांनी त्यांचे अर्ज आवश्यक त्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्रासह हि जाहिरात प्रसिध्द **झाल्याच्या दिनांकापासून दि. १३.१०.२०२३ पर्यंत सादर करावेत.**


**संपर्क** :- राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त यांचे कार्यालय, ७ वा मजला, नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मुंबई- ४०० ०३२

**दूरध्वनी :- ०२२ -२२८३२३४६**

**ई-मेल** :- ccrts@maharashtra.gov.in


मा.मुख्य आयुक्त यांच्या मान्यतेने

(वैशाली राज चव्हाण {निर्भार})
उप सचिव
राज्य मुख्य सेवा हक्क आयोग

D:\गवस मॅडम\२०२३\२०२३ करार पद्धतीने नियुक्ती (Autosaved).docx